महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासं/रवका/न.क्र.९/२९२९३
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,
माटुंगा, मुंबई ४०० ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दिनांक : ३०.११.२०१७

# परिपत्रक

**विषय :** महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित मधील कर्मचाऱ्यांसाठी **सन २०१८** या कॅलेंडर वर्षासाठी सार्वजनिक सुट्टया जाहीर करणेबाबत.

.....

प्रशासकीय परिपत्रक क्र. ०१ दिनांक २९.०९.२००५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी **सन २०१८** या वर्षासाठी सोबत जोडलेल्या परिशिष्ट 'अ' मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या **२२ सार्वजनिक सुट्टया** महावितरण कंपनीच्या प्रशासकीय कार्यालयांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांकरिता [कर्मचारी सेवा विनियमातील परिशिष्ट 'क' (APPENDIX-'A') मध्ये समाविष्ट केलेल्या पदांवर काम करणारे कर्मचारी व प्रशासकीय कार्यालयांव्यतिरिक्त इतर ठिकाणी काम करणारे कर्मचारी, तसेच स.सा.आदेश क्र. १२२ (क) दि.२२.०३.१९९० सोबतच्या जोडपत्र 'क' (ANNEXURE-'A') आणि त्यानंतरच्या दि. ०३.०४.१९९० व दि. १८.०८.१९९० च्या पूरकपत्रांमध्ये नमूद केलेल्या पदावर काम करणारे कर्मचारी वगळून] जाहीर करण्यास मंजूरी दिली आहे. सदर सार्वजनिक सुट्टया या राज्य शासनाने परक्राम्य संलेख अधिनियम १८८१ (Negotiable Instruments Act 1881) चे कलम २५ अनुसार घोषित केलेल्या सार्वजनिक सुट्टया आहेत.

२. कर्मचारी सेवा विनियमाशी संलग्न असलेल्या परिशिष्ट 'क' (APPENDIX-'A') अंतर्गत मोडणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्यांचे कामाचे ठिकाण विचारात न घेता तसेच कंपनीची प्रशासकीय कार्यालये वगळता विद्युत उपकेंद्र अथवा कार्यालये/कार्यस्थाने (वर्क साईटस्/घटक/आस्थापना) या ठिकाणी काम करणाऱ्या तांत्रिक कर्मचाऱ्यांना (ते कोणत्या परिशिष्टाखाली मोडतात हे विचारात न घेता) आणि सामान्य आदेश क्र. १२२ (क) दि. २२.०३.१९९० सोबतच्या जोडपत्र 'क' (ANNEXURE-'A') व त्यासंबंधीची पूरकपत्रे दि. ०३.०४.१९९० व दि. १८.०८.१९९० यामध्ये नमूद केलेल्या पदांवर काम करणारे कर्मचारी यांना प्रजासत्ताक दिन व स्वातंत्र्य दिन अगर त्याबद्दलची पर्यायी सुट्टी जमेस धरुन फक्त **६ (सहा) भरपगारी सुट्टया** जाहीर करण्यास मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी मंजूरी दिली आहे. प्रभारी अधिकाऱ्यांची पूर्व मंजूरी घेऊन या कर्मचाऱ्यांना वरील प्रमाणे ६ (सहा) सुट्टया उपभोगता येतील.

३. नाममात्र हजेरीपटावरील आणि कार्यव्ययी आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना (नैमित्तिक कामगार वगळून) सन २०१८ यावर्षी प्रजासत्ताक दिन (दि. २६ जानेवारी) व स्वातंत्र्य दिन (दि. १५ ऑगस्ट) या दोन राष्ट्रीय सणांच्या दिवशी तसेच महाराष्ट्र दिन (दि. १ मे) या राजकीय सणाच्या दिवशी भरपगारी सुट्टया मंजूर करण्यात आल्या आहेत. या सुट्टीच्या दिवशी काम करणारे कर्मचारी बदली/पर्यायी सुट्टी मंजूर करुन घेण्यास पात्र राहतील.

४. सदर परिपत्रक कंपनीच्या R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

(संदेश हाके) ३०/११
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)

सहपत्रे : सार्वजनिक सुट्टयांची सूची
(परिशिष्ट - 'अ')

## परिशिष्ट 'अ'

## सार्वजनिक सुट्या-२०१८

### (अ)

| अ.क्र. | सुट्टीचा दिवस | इंग्रजी तारीख | वार |
|---|---|---|---|
| १. | प्रजासत्ताक दिन | २६ जानेवारी, २०१८ | शुक्रवार |
| २. | महाशिवरात्री | १३ फेब्रुवारी, २०१८ | मंगळवार |
| ३. | छत्रपति शिवाजी महाराज जयंती | १९ फेब्रुवारी, २०१८ | सोमवार |
| ४. | होळी (दुसरा दिवस) | ०२ मार्च, २०१८ | शुक्रवार |
| ५. | महावीर जयंती | २९ मार्च, २०१८ | गुरुवार |
| ६. | गुड फ्रायडे | ३० मार्च, २०१८ | शुक्रवार |
| ७. | बुध्द पोर्णिमा | ३० एप्रिल, २०१८ | सोमवार |
| ८. | महाराष्ट्र दिन | ०१ मे, २०१८ | मंगळवार |
| ९. | रमझान ईद (ईद-उल-फितर) (शव्वल-१) | १६ जून, २०१८ | शनिवार |
| १०. | स्वातंत्र्य दिन | १५ ऑगस्ट, २०१८ | बुधवार |
| ११. | पारशी नववर्ष दिन (शहेनशाही) | १७ ऑगस्ट, २०१८ | शुक्रवार |
| १२. | बकरी ईद (ईद-उल-झुवा) | २२ ऑगष्ट, २०१८ | बुधवार |
| १३. | गणेश चतुर्थी | १३ सप्टेंबर, २०१८ | गुरुवार |
| १४. | मोहरम | २० सप्टेंबर, २०१८ | गुरुवार |
| १५. | महात्मा गांधी जयंती | ०२ ऑक्टोबर, २०१८ | मंगळवार |
| १६. | दसरा | १८ ऑक्टोबर, २०१८ | गुरुवार |
| १७. | दिवाळी अमावस्या (लक्ष्मीपूजन) | ०७ नोव्हेंबर, २०१८ | बुधवार |
| १८. | दिवाळी (बलिप्रतिपदा) | ०८ नोव्हेंबर, २०१८ | गुरुवार |
| १९. | भाऊबीज | ०९ नोव्हेंबर, २०१८ | शुक्रवार |
| २०. | ईद-ए-मिलाद | २१ नोव्हेंबर, २०१८ | बुधवार |
| २१. | गुरु नानक जयंती | २३ नोव्हेंबर, २०१८ | शुक्रवार |
| २२. | ख्रिसमस | २५ डिसेंबर, २०१८ | मंगळवार |

### (ब)

खालील सण महिन्याच्या **दुसऱ्या शनिवारी व रविवारी** येत असल्यामुळे त्या दिवशी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आलेली नाही.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | गुढी पाडवा | १८ मार्च, २०१८ | रविवार |
| २. | राम नवमी | २५ मार्च, २०१८ | रविवार |
| ३. | डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती | १४ एप्रिल, २०१८ | दुसरा शनिवार |

D:\Holidays-2018.docx